# आरती श्री शंकराची

ॐ नम: शिवाय ।

जय शंकर शिव शंकर शंभू महादेवा
आरती ओवाळू तुज सांब सदाशिवा
जय शंकर शिव शंकर ॥धृ.॥

कर्पुरगौर तू रूद्राधिपती
ध्यानस्थ कैलासी भुजंगधारी
झेली भागिरथी मस्तकी मानवांसाठी
देवांसाठी पचवी हलाहल त्रिपुरारी
जय शंकर शिव शंकर ॥१॥

महाक्रोधी तू अती भोळाही पण
महायोगी तू सर्वकलानिपुण
नटराज तू नादब्रह्म सगुण
ज्ञानराज तू परब्रह्म निर्गुण
जय शंकर शिव शंकर ॥२॥

अधिपती अधिदेव त्रिदेवात तू मुख्य
अर्धांगी पार्वती तव निर्मी हे विश्व
प्रलयी परी करी तूची त्याचा विलय
समजे भक्त जो हे होई निर्भय
जय शंकर शिव शंकर ॥३॥

- नारायण
महाशिवरात्र, शके १९२०
०२/१४/९९

ॐ
उमापती महादेव की जय ।

ॐ

वज्रदंष्ट्रं त्रिनयनं कालकंठमरिंद्रमं ।
सहस्रकरमत्युग्रं वंदे शंभुं उमापतिम् ॥

ॐ

कैलासराणा शिव चंद्रमौळी
फणींद्र माथा मुकुटी झळाळी
कारूण्यसिंधो भवदुःख हारी
तुजविण शंभो मज कोण तारी